# Study Circle Career Development Institute

# General Studies
# Paper - I
## (MP 1)

**A**

**Time : 2 Hrs.** **Marks : 200**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्याच विषयाचे प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आले आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

१. देवगिरीच्या यादव राज्यकर्त्यांच्याबाबत योग्य जोड्या जुळवा.

| **स्तंभ अ (राजा)** | **स्तंभ ब (घटना)** |
|---|---|
| अ. पाचवा भिल्लम | I. ज्योतिष आणि संगीत यांना उदार आश्रय दिला. |
| ब. सिंधण | II. देवगिरी येथे आपली राजधानी स्थापली. |
| क. रामदेव राय | III. कर्नाटकातील होयसळांनी त्याचा पराभव केला. |
| ड. शंकरदेव | IV. देवगिरीवर मलिक कफूरची तिसरी स्वारी |

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | II | III | I | IV |
| (2) | II | I | III | IV |
| (3) | III | II | IV | I |
| (4) | IV | III | I | II |

---

२. १९२१ मध्ये खालीलपैकी कोणी सिंधु संस्कृतीतील ‘हडप्पा’ शहराचा उत्खननातून शोध लावला.

(1) डॉ. रिचर्ड मेडो (2) सर जॉन मार्शल (3) दयाराम सहानी (4) राखलदास बॅनर्जी

---

३. मौर्य राज्याचे विभाग व राजधान्या याबाबत योग्य जोड्या जुळवा.

| **स्तंभ अ (विभाग)** | **स्तंभ ब (राजधानी)** |
|---|---|
| अ. मध्य विभाग | I. उज्जैन |
| ब. पूर्व विभाग | II. तोसली |
| क. दक्षिण विभाग | III सुवर्णगिरी |
| ड. पश्चिम विभाग | IV. गिरीनगर |
| इ. वायव्य विभाग | V. तक्षशिला |

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| (1) | I | III | V | IV | II |
| (2) | II | V | I | IV | III |
| (3) | I | II | III | IV | V |
| (4) | V | III | I | II | IV |

---

४. खालीलपैकी चुकीची जोडी शोधा.

(1) अमोघवर्ष – कविराजमार्ग

(2) पंपा – विक्रमार्जुन विजय

(3) राजा प्रवरसेन – सेतुबंध

(4) हेमचंद्र – महावीरचरित

---

५. वेरुळ येथील लेण्याबाबत अचूक जोड्या जुळवा :

**स्तंभ अ (लेणी क्रमांक)**

अ. लेणे क्रमांक ३

ब. लेणे क्रमांक ५

क. लेणे क्रमांक ६

ड. लेणे क्रमांक १०

**स्तंभ ब (वैशिष्ट्य )**

I. बौद्ध चैत्यगृह विश्वकर्मा लेणे प्रख्यात.

II. सरस्वती या हिंदुदेवतेची महामायुरी ही बौद्ध प्रतिकृती.

III. बौद्धविहार–बुद्धाची धम्मचक्र प्रवर्तनमुद्रित

IV. बोधिसत्व अवलोकितेश्वराचे चमत्कार

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | IV | III | I | II |
| (2) | II | I | III | IV |
| (3) | III | II | IV | I |
| (4) | IV | III | II | I |

---

६. .......... हा इतिहासकार म्हणतो – ''दक्षिण ही औरंगजेबाची कबर बनली.''

(1) ग्रँट डफ (2) लेनपूल (3) विल्यम डॅलरिंपल (4) बिपिन चंद्रा

---

७. जोड्या जुळवा :

**स्तंभ अ (संस्थापक)**

अ. सय्यद अहमद खान

ब. डॉ. टी. एम. नायर

क. मिर्झा गुलाम अहमद

ड. व्ही. रामस्वामी नायकर

**स्तंभ ब (चळवळ )**

I. देवबंद चळवळ

II. अहमदिया चळवळ

III. अलिगड चळवळ

IV. आत्मसन्मान चळवळ

V. जस्टीस पार्टी चळवळ

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| (1) | II | III | I | IV | V |
| (2) | II | IV | V | I | III |
| (3) | III | IV | II | V | I |
| (4) | V | III | I | II | IV |

---

८. पुढील वाक्यात कोणाचे वर्णन केले आहे ?

अ. ख्रिश्चनांनी केलेल्या अज्ञानी हल्ल्यापासून त्यांनी वैदिक तत्त्वज्ञानाचे समर्थन केले.

ब. त्यांच्या ख्रिस्त धर्मावरील पुस्तकात येशूचे नैतिक आध्यात्मिक दृष्टिकोन तसेच चमत्काराच्या वर्णनाचा अंतर्भाव आहे.

क. त्यांनी ब्राह्मणेतर वर्गाला वेदांच्या पठणाचे अधिकार दिले.

ड. त्यांनी इतर धर्माच्या शिकवणींचा त्यांच्या संस्थेच्या उक्रमात अंतर्भाव केला.

**पर्यायी उत्तरे :**

(1) रेव्हरंड ना. वा. टिळक (2) स्वामी दयानंद सरस्वती

(3) कर्नल ब्लाव्हटस्की (4) राजा राममोहन राय

९. जोड्या जुळवा :

| **स्तंभ अ** | **स्तंभ ब** |
| --- | --- |
| अ. मुझफ्फरपूरचा कट | I. तारकेश्वर, सूर्यसेन, कल्पना दत्त व अजय घोष |
| ब. काकोरी कट | II. रामप्रसाद बिस्मिल, राजेंद्रनाथ लाहिरी व अशफाकुल्लाखान |
| क. मीरत कट | IV. श्रीपाद डांगे, जोगळेकर व निंबकर |
| ड. चितगाव कट | III. प्रफुल्लकुमार व खुदीराम बोस |

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड |
| --- | --- | --- | --- | --- |
| (1) | II | III | I | IV |
| (2) | II | I | III | IV |
| (3) | III | II | IV | I |
| (4) | IV | III | I | II |

---

१०. खालील विधानांचा विचार करा व उत्तराचा योग्य पर्याय निवडा ?

अ. लोकमान्य टिळक आणि गोपाळ गणेश आगरकर या दोन महापुरुषांच्या परस्परसंबंधांचा वेध डॉ. य. दि. फडके यांनी ’शोध बाल गोपाळांचा’ या पुस्तकात घेतला आहे.

ब. ’न्यू इंग्लिश स्कूल’ ही शाळा टिळक, आगरकर आणि त्यांचे नामजोशी, केळकर, चिपळूणकर, दामले इत्यादी सहकारी यांनी संयुक्त जबाबदारीच्या तत्त्वावर ’मराठा’ हे इंग्रजी आणि ’केसरी’ हे मराठी अशी वृत्तपत्रे सुरू केली होती.

क. ’केसरी’कार आगरकर यांच्या लेखन स्वातंत्र्यावर काही मर्यादा होत्या.

ड. टिळकांनी सिहंगडावरच्या वास्तव्यात लिहिलेल्या ओरायन या ग्रंथाचा काही भाग केसरीत प्रकाशित झाला होता.

**पर्यायी उत्तरे :**

(1) विधान अ बरोबर असून ब,क आणि ड चुकीची विधाने आहेत.

(2) ब आणि ड विधाने चुकीची असून अ आणि क बरोबर आहेत.

(3) अ आणि क विधाने बरोबर असून ब आणि ड चुकीचे आहे.

(4) ड विधान बरोबर असून अ,ब आणि क चुकीची विधाने आहेत.

---

११. पुढील घटनांची त्यांच्या कालक्रमानुसार मांडणी करा..

अ. लोकमान्य टिळकांचा मृत्यू

ब. हंटर अहवाल ब्रिटनच्या संसदेने स्वीकारला.

क. असहकार चळवळीस सुरुवात

ड. अलीगड मुस्लीम विद्यापीठाची सुरुवात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) ड, अ, ब, क (2) अ, ड, क, ब (3) ड, ब, अ, क (4) अ, ड, क, ब

---



Study CIRCLE

१२. विल्यम जोन्सने कोणत्या ग्रंथांचे भाषांतर केले?

अ. हितोपदेश ब. अर्थशास्त्र क. गीत गोविंद ड. शाकुंतल

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ आणि ब (2) फक्त अ, ब आणि क

(3) फक्त अ,क आणि ड (4) वरील सर्व

---

१३. खालीलपैकी कोणती विधाने भारतीय आझाद हिंद सेनेच्या (INA) संदर्भात बरोबर आहेत?

अ. कॅ. मोहन सिंग, प्रेम सहगल, शाहनवाझ आणि गु. के. ढिल्लाँ या आयएनएच्या अधिकाऱ्यांना ब्रिटिशांच्या चौकशीस सामोरे जावे लागले.

ब. एक सेनापथक म्हणून १५ जुलै १९४२ रोजी पहिल्या आय.एन.ए. ची स्थापना झाली.

क. कॅ. मोहन सिंग हे पहिल्या आय.एन.ए. चे अत्युच्च अधिकारी होते.

ड. मेजर जनरल जे. आर. भोसले यांनी १९४५ पर्यंत आयएनएचे चिफ ऑफ स्टाफ म्हणून काम केले.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ,क आणि ड (2) फक्त अ,ब आणि क

(3) अ,ब,क आणि ड (4) फक्त ब,क आणि ड

---

१४. ''जर शिंदे बंडखोरांना जाऊन मिळाले, तर मला उद्याच गाशा गुंडाळावा लागेल'' हे वाक्य कोणी म्हटले?

(1) हेन्री बटलर (2) लॉर्ड कॅनिंग

(3) लॉर्ड डलहौसी (4) थॉमस हिस्लॉप

---

१५. खालील दिलेल्या वाक्यांचा क्रम ती चूक (F) अथवा बरोबर (T) या पद्धतीने लावा.

I) बक्सारच्या लढाईनंतर कंपनीने भारतीय राज्यांमध्ये राज्यप्रतिनिधी नेमला.

II) राज्य प्रतिनिधीने साम्राज्य सत्तेचे प्रतिनिधित्व स्थानिक न्यायालयात केले.

III) १७६५ मध्ये मुघल सम्राटाने कंपनीला बंगाल प्रांताचा दिवाण म्हणून नेमले.

IV) राज्य प्रतिनिधीने आर्थिक व प्रशासकीय हक्कांचा वापर केला.

(1) T-F-F-T (2) T-T-F-T

(3) T-T-T-T (4) F-T-F-T

---



Study CIRCLE

१६. स्तंभ अ आणि स्तंभ ब यांच्या योग्य जोड्या जुळवा:

| **स्तंभ अ (आंतरनिर्मित अग्निजन्य खडक)** | **स्तंभ ब (वैशिष्ट्ये )** |
|---|---|
| अ. बॅथोलिथ | I. उभ्या अरुंद भेगामध्ये निर्माण होणारे खडक यांचा वरचा भाग गोल असतो. |
| ब. लॅकोलिथ | II. अवाढव्य आकाराचे व घुमटाकार खडक भूपृष्ठाखाली त्यांचा खोलवर विस्तार |
| क. स्टॉक | III. घुमटाकार व लहान बॅथोलिथच्या आकाराचे. विस्तार कमी असतो. |
| ड. सिल | IV. भूपृष्ठाला समांतर, आडवा विस्तृत विस्तार, जास्त जाडीचे आंतरनिर्मित खडक. |

**पर्यायी उत्तरे :**

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| (1) | II | III | I | IV |
| (2) | II | I | III | IV |
| (3) | III | II | IV | I |
| (4) | IV | III | I | II |

---

१७. भूकंप लहरीबाबत योग्य पर्याय निवडा.

अ. प्राथमिक भूकंप लहरी वरच्या खालच्या दिशेने प्रवास करतात.

ब. दुय्यम भूकंप लहरी फक्त कठीण आणि द्रवरूप माध्यमातून प्रवास करतात.

क. भूपृष्ठलहरींची निर्मिती भूपृष्ठावर होते व त्या कमी वेगाने प्रवास करतात.

ड. दुय्यम आणि भूपृष्ठ भूकंपलहरी या अधिक विनाशकारी असतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) क आणि ड (2) ब आणि ड (3) अ आणि क (4) अ आणि ब

---

१८. खालील विधानांचे परीक्षण करा आणि योग्य पर्याय निवडा.

*विधान 'अ' :* पृथ्वीच्या वातावरणातील स्थितांबरापलीकडे असलेल्या सुमारे ५०० कि.मी. उंचीपर्यंतच्या दलांबर थराला आयनांबर असेही म्हणतात.

*विधान 'ब' :* दलांबरामध्ये १८० कि.मी. उंचीवर तापमान ३९६ अंश से. इतके असते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) विधान 'अ' आणि 'ब' दोन्ही बरोबर आहेत.

(2) विधान 'अ' बरोबर असून विधान 'ब' चूक आहे

(3) विधान 'अ' चूक असून विधान 'ब' बरोबर आहे.

(4) विधान 'अ' आणि 'ब' दोन्ही चूक आहेत.

---

१९. खालील विधानांची सत्यता तपासा, आणि खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ते ओळखा.

*विधान 'अ' :* गंगा, यमुना आणि कोसी नद्यांचा उगम हिमालय पर्वत रांगांमध्ये झाल्यानंतर त्या भारताच्या विस्तृत मैदानी प्रदेशातून वाहतात, परिणामी हुगळी नदीपात्रात मोठ्या प्रमाणात गाळाचे संचयन होते.

*विधान 'ब' :* हुगळी ही जगातील सर्वात मोठी वितरिका आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) विधान 'अ' आणि 'ब' दोन्ही बरोबर आहेत.

(2) विधान 'अ' बरोबर असून विधान 'ब' चूक आहे

(4) विधान 'अ' आणि 'ब' दोन्ही चूक आहेत.

(3) विधान 'अ' चूक असून विधान 'ब' बरोबर आहे.

---

२०. स्तंभ अ आणि स्तंभ ब यांच्या योग्य जोड्या जुळवा:


| **स्तंभ अ (स्थानिक वारे)** | **स्तंभ ब (आढळणारे प्रदेश)** |
|---|---|
| अ. ब्रिक फिल्डर्स | I. अर्जेंटिना |
| ब. झोंडा | II. मध्य आशियाचे तारिन खोरे |
| क. सोलॅनो | III. स्पेनचा पूर्व किनारा |
| ड. काराबुरान | IV. ऑस्ट्रेलिया |

**पर्यायी उत्तरे :**

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| (1) | II | III | I | IV |
| (2) | II | I | III | IV |
| (3) | III | II | IV | I |
| (4) | IV | I | III | II |

---

२१. खालील आकृतीत B, C, D आणि T या अक्षरांनी दर्शविलेले सागरतळ रचनेचे विभागांचा योग्य क्रम पुढीलपैकी कोणता ते सांगा.




(1) जलमग्नभूमी, खंडात उतार, सागरी गर्ता, सागरी मैदान

(2) सागरी मैदान, सागरीगर्ता, खंडांत उतार, जलमग्नभूमी

(3) जलमग्नभूमी, खंडांत उतार, सागरी मैदान, सागरी गर्ता

(4) खंडांत उतार, सागरी मैदान, जलमग्नभूमी, सागरी गर्ता

study CIRCLE

२२. विधान अ आणि ब यांचे परीक्षण करुन योग्य पर्याय निवडा.

*विधान अ :* आभ्यांतरित ज्वालामुखी क्रियेमुळे पातालिक खडक निर्माण होतात.

*विधान 'ब' :* अंतर्गत भागात मोठमोठ्या पोकळ्या असतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) विधान 'अ' आणि 'ब' दोन्ही सत्य असून 'ब' हे 'अ' चे योग्य स्पष्टीकरण आहे.

(2) विधान 'अ' आणि 'ब' दोन्ही सत्य असून 'ब' हे 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

(3) विधान 'अ' सत्य असून विधान 'ब' असत्य आहे.

(4) विधान 'अ' असत्य असून विधान 'ब' सत्य आहे.

---

२३. महाद्वीप व महासागर उत्पत्तीचा सिद्धांताबाबत स्तंभ अ आणि स्तंभ ब यांच्या जोड्या जुळवा :

| | स्तंभ अ | | स्तंभ ब |
|---|---|---|---|
| अ. | पेंटागोनल डोडिकाहेड्रन परिकल्पना | I. | लोथियन ग्रीन, १८७५ |
| ब. | चतुष्फलक सिद्धांत | II. | अल्फ्रेड वेगनर |
| क. | महाद्वीपीय विस्थापन परिकल्पना | III. | एफ. बी. टेलर |
| ड. | महाद्वीपीय प्रवाह सिद्धांत | IV. | ईली डी. ब्यूमांट |

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | I | III | I | IV |
| (2) | II | IV | III | IV |
| (3) | III | II | IV | I |
| (4) | IV | I | III | II |

---

२४. स्तंभ अ आणि स्तंभ ब यांच्या योग्य जोड्या जुळवा:

| | स्तंभ अ (मृदेचा प्रकार) | | स्तंभ ब (वैशिष्ट्य) |
|---|---|---|---|
| अ. | लाल माती | I. | पिकांना हानीकारक असे कॅल्शियम, सोडियम संयुगे यांचे जास्त प्रमाण |
| ब. | काळी माती | II. | फॉस्फरस, नत्र, चुना यांचे कमी प्रमाण |
| क. | जांभा जमीन | III. | ओलावा शोषून धरणारी व उत्पादक चिकणमाती |
| ड. | क्षारयुक्त जमीन | IV. | आम्ले आणि क्षार यांचे जास्त प्रमाण |

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | IV | III | II | I |
| (2) | I | IV | III | II |
| (3) | III | II | IV | I |
| (4) | II | III | IV | I |

---

२५. जोड्या जुळवून योग्य पर्याय निवडा :

| *स्तंभ–१ (व्याघ्र प्रकल्प)* | *स्तंभ २ (राज्य)* |
|---|---|
| अ. बांदीपूर | I. अरुणाचल प्रदेश |
| ब. शिमलीपाल | II. उत्तर प्रदेश |
| क. नामदाफा | III. कर्नाटक |
| ड. दुधवा | IV. ओरिसा |

**पर्यायी उत्तरे :**

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| (1) | II | III | I | IV |
| (2) | II | I | III | IV |
| (3) | III | IV | I | II |
| (4) | IV | III | I | II |

---

२६. भारतात उत्पादित होणाऱ्या ८६ खनिजांच्या योग्य जोड्या जुळवून योग्य पर्याय निवडा.

| **स्तंभ अ (खनिजे)** | **स्तंभ ब (संख्या)** |
|---|---|
| अ. आण्विक खनिजे | I. 23 |
| ब. इंधन खनिजे | II. 3 |
| क. धातू खनिजे | III. 46 |
| ड. इतर खनिजे | IV. 4 |
| इ. अधातू खनिजे | V. 10 |

**पर्यायी उत्तरे :**

| | **अ** | **ब** | **क** | **ड** | **इ** |
|---|---|---|---|---|---|
| (1) | II | III | I | IV | V |
| (2) | II | IV | V | I | III |
| (3) | III | IV | II | V | I |
| (4) | V | III | I | II | IV |

---

२७. नदीकाठावरील शहरे व नदी यांच्या जोड्या जुळवून योग्य पर्याय निवडा.

| **स्तंभ अ (*शहर*)** | **स्तंभ ब *(नदी)*** |
|---|---|
| अ. गोरखपूर | I. घागरा |
| ब. सुरत | II. नर्मदा |
| क. एरोड | III. कावेरी |
| ड. कोटा | IV. चंबळ |

**पर्यायी उत्तरे :**

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| (1) | II | III | I | IV |
| (2) | II | I | III | IV |
| (3) | III | II | IV | I |
| (4) | IV | III | I | II |



Study CIRCLE

२८. खाली दोन विधान दिलेली आहेत (अ) विधान असून (र) हे कारण आहे खालील पर्यायातून योग्य पर्याय निवडा.

**विधान (अ)** : १० लाख वर्षांपूर्वी हिमालयाची तिसरी श्रेणी ''शिवालिक श्रेणी'' निर्माण झाली.

**कारण (र)** : क्रिटेशस युगात अंगारा भूभाग दक्षिणेकडे हळूहळू सरकून 'हिमालय' या हा वलीपर्वत टेथिस समुद्रातून वर आला.

**पर्यायी उत्तरे** :

(1) (अ) आणि (र) दोन्ही सत्य असून (र) हे (अ) चे बिनचूक स्पष्टीकरण आहे.

(2) (अ) आणि (र) दोन्ही सत्य असून (र) हे (अ) चे बिनचूक स्पष्टीकरण नाही.

(3) (अ) सत्य असून विधान (र) असत्य आहे.

(4) (अ) असत्य असून विधान (र) सत्य आहे.

---

२९. खाली दोन विधान दिलेली आहेत (अ) हे विधान असून (र) हे कारण आहे खालील पर्यायातून योग्य पर्याय निवडा.

**विधान (अ)** : लोकसंख्येच्या स्थित्यंतर सिद्धांतानुसार लोकसंख्यावाढीची दुसरी अवस्था म्हणजे लोकसंख्या विस्फोट होय.

**कारण (र)** : कोल आणि हूव्हर यांच्या लोकसंख्या स्थित्यंतराचा सिद्धांतानुसार ''प्रत्येक राष्ट्र लोकसंख्या स्थित्यंतराच्या तीन टप्प्यांतून जाते.''

**पर्यायी उत्तरे** :

(1) (अ) आणि (र) दोन्ही सत्य असून (र) हे (अ) चे बिनचूक स्पष्टीकरण आहे.


(2) (अ) आणि (र) दोन्ही सत्य असून (र) हे (अ) चे बिनचूक स्पष्टीकरण नाही.

(3) (अ) सत्य असून विधान (र) असत्य आहे.

(4) (अ) असत्य असून विधान (र) सत्य आहे.

---

३०. दिलेल्या नकाशाचे अवलोकन करा आणि ईशान्य भारतात नै. मोसमी वारे कोणत्या कालावधीत सुरू होतात ते ओळखा.




(1) ५ जून ते १० जून

(2) १ जून ते ५ जून

(3) १० जून ते १५ जून

(4) वरीलपैकी नाही

---

३१. उच्च अथवा सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना महाभियोगाच्या प्रक्रियेद्वारे पदावरून दूर केले जाते. याबाबत खालीलपैकी कोणते विधान सत्य आहे ?

अ. संसदेच्या दोन्ही सभागृहांनी प्रत्येकी २/३ बहुमताने ठराव संमत करुन कार्यवाहीसाठी राष्ट्रपतींकडे सादर केला जातो.

ब. राज्यसभेच्या ५० अथवा लोकसभेच्या १०० सदस्यांनी तसा ठराव संमत केल्यास महाभियोगाची प्रक्रिया सुरु होते.

क. राज्यसभेचे अध्यक्ष अथवा लोकसभेचे सभापती गैरवर्तणुकीच्या चौकशीसाठी एक समिती स्थापन करतात.

ड. भारतीय संविधानातील कलम २२६ मध्ये याबाबत सविस्तर माहिती आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) विधाने अ, ब आणि क बरोबर
(2) विधाने ब, क आणि ड बरोबर
(2) विधाने अ, ब आणि ड बरोबर
(4) विधाने अ, क आणि ड बरोबर

---

३२. भारताच्या घटनेतील कोणते कलम सार्वजनिक रोजगाराच्या समान संधीबाबत आहे तसेच त्यानुसार सर्व नागरिकांकरिता राज्याच्या कोणत्याही कार्यालयातील रोजगारांसंदर्भात समान संधीची तरतूद करण्यात आली आहे?

(1) कलम १४
(2) कलम १५
(3) कलम १६
(4) कलम १८

---

३३. वीरप्पा मोईली यांच्या अध्यक्षतेखाली दुसऱ्या प्रशासकीय सुधारणा आयोगाने ...... विषयांवरील अहवाल प्रथमच सादर केला.

अ. सुशासनातील नैतिक मूल्ये

ब. लोकाभिमुख प्रशासन

क. नागरिकांची सनद

ड. समस्या व संघर्षाच्या सोडवणुकीसाठी प्रशासकीय क्षमतांमध्ये वाढ करणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) विधाने अ, ब बरोबर, क, ड चूक
(2) विधाने ब, क, ड बरोबर, अ चूक
(3) विधाने अ, क, ड बरोबर, ब चूक
(4) विधाने ब, क बरोबर, अ, ड चूक

---

३४. संविधानसभेबाबत खालीलपैकी कोणते विधान असत्य आहे ?

(1) घटनाविषयक सल्लागार बी. एन. राव यांनी घटनेचा कच्चा आराखडा तयार केला.
(2) संविधानसभेच्या घटना निर्मितीविषयक कामकाजाचे अध्यक्षपद डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्याकडे होते.
(3) संविधानसभेच्या विधीविषयक कामकाजाचे अध्यक्षपद ग. वा. मावळणकर यांच्याकडे होते.
(4) रत्नापा कुंभार यांची संविधानसभेचे सदस्य म्हणून मुंबई प्रांतीय विधीमंडळाद्वारे निवड झाली होती.

---

३५. उच्च न्यायालय व त्याचे ठिकाण यांच्या जोड्या जुळवा.

| *यादी–अ (उच्च न्यायालयांचे नाव)* | *यादी–ब (उच्च न्यायालयाचे स्थान)* |
|---|---|
| अ) छत्तीसगड | I. एर्नाकुलम |
| ब) केरळ | II. जबलपूर |
| क) राजस्थान | III. बिलासपूर |
| ड) मध्य प्रदेश | IV. जोधपूर |

**पर्यायी उत्तरे :**

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| (1) | II | III | I | IV |
| (2) | II | I | III | IV |
| (3) | III | I | IV | II |
| (4) | IV | III | I | II |

३६. पंचायत राज व्यवस्थेच्या संदर्भातील खालीलपैकी अशोक मेहता समितीच्या कोणत्या शिफारशी या बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीपेक्षा वेगळ्या आहेत?

अ. पंचायत राज्य व्यवस्थेत दुहेरी स्तर.

ब. पंचायती राज व्यवस्थेतील निवडणुकीत सर्व स्तरांवर राजकीय पक्षांचा अधिकृत सहभाग.

क. जिल्हा परिषद ही कार्यकारी यंत्रणा.

ड. जिल्हा परिषदेकडे विकासाची कार्य सोपविणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ आणि ब (2) अ, ब आणि क (3) अ, ब आणि ड (4) अ, क आणि ड

३७. यादी I व यादी II यांची जोडी जुळवून खाली दिलेल्या संकेतातून अचूक संकेत निवडा :

| *यादी I* | *यादी II* |
|---|---|
| अ. कलम १५६ | I. राज्याचा कार्यकारी अधिकार |
| ब. कलम १५४ | II. राज्यपालांचा कार्यकाल |
| क. कलम १५३ | III. राज्यपालांची नियुक्ती |
| ड. कलम १५५ | IV. राज्यांचे राज्यपाल |
| | V. विशिष्ट परिस्थितीमध्ये पार पाडण्याची राज्यपालांची कार्ये |

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| (1) | III | IV | V | I |
| (2) | II | I | IV | III |
| (3) | V | II | III | IV |
| (4) | II | III | IV | I |

३८. भारतीय राज्यघटनेतील कोणती तरतूद कॅनडाच्या राज्यघटनेतून घेण्याढ्त आलेली आहे ?

अ. प्रभावशाली केंद्र शासन असलेली संघराज्य व्यवस्था व संघसूची

ब. शेषाधिकार केंद्राकडे व सभापतीचे पद

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ (2) फक्त ब (3) वरीलपैकी एकही नाही (4) अ आणि ब

---

३९. मूलभूत हक्कांना 'मूलभूत' म्हणून ओळखले जाते कारण–

अ. साध्या विधेयकांद्वारे त्यामध्ये दुरुस्ती किंवा बदल करता येत नाही.

ब. मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी ते आवश्यक असतात.

क. हक्कांबद्दल न्यायालयात दाद मागता येते.

ड. त्यांचा समावेश संविधानाच्या तिसऱ्या भागात केला गेला आहे.

वरीलपैकी कोणते विधाने बरोबर आहेत ?

(1) अ, ब आणि क (2) ब आणि क (3) क आणि ड (4) अ आणि ड

---

४०. खालीलपैकी कोणते/ती विधान/ने ***चुकीचे*** आहे/त ?

अ. निरंकुश नकाराधिकार – विधेयकाला मान्यता देण्याबाबत कोणतीही कृती न करणे

ब. गुणात्मक नकाराधिकार – कायदेमंडळ यावर विशेष बहुमताच्या आधारे मात करू शकते.

क. तात्पुरता नकाराधिकार – विधेयकास मंजुरी अथवा नकार न देणे, अथवा ते परत न पाठविणे.

ड. पॉकेट नकाराधिकार – कायदेमंडळ यावर साध्या बहुमताच्या आधारे मात करू शकते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ (2) फक्त ब

(3) वरीलपैकी एकही नाही (4) अ आणि ब

---

४१. जोड्या जुळवा :

| **स्तंभ अ (संविधान समिती)** | **स्तंभ ब (अध्यक्ष )** |
|---|---|
| अ. मूलभूत हक्क उपसमिती | I. एच. सी. मुखर्जी |
| ब. अल्पसंख्याक उपसमिती | II. सरदार वल्लभभाई पटेल |
| क मसुदा परीक्षण समिती | III. जे. बी. कृपलानी |
| ड. प्रांतीय संविधान समिती | IV. ए. के. अय्यर |

**पर्यायी उत्तरे :**

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| (1) | II | III | IV | I |
| (2) | III | I | IV | II |
| (3) | I | II | IV | I |
| (4) | IV | III | I | II |

---

४२. पुढील यादीतील सार्वजनिक धोरणे ही मूलभूत धोरणाची ठोस उदाहरणे आहेत. दिलेल्या यादीतील नियामक धोरणांची उदाहरणे ओळखून त्यापैकी **अयोग्य** पर्याय निवडा.

अ. करनिर्धारण धोरण

ब. पर्यावरण धोरण

क. किमान वेतन धोरण

ड. बँकिंग (अधिकोषीय) आणि विमा धोरण

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ (2) ब (3) क (4) वरीलपैकी एकही नाही

---

४३. युनेस्कोचे तत्कालीन कायदेविषयक सल्लागार कॅरल वसाक यांनी मानवी हक्कांचे तीन प्रकारांत वर्गीकरण केलेले आहे, त्यात कोणती बाब समाविष्ट नाही ?

अ. पहिल्या पिढीचे मानवी हक्क (ICCPR)

ब. दुसऱ्या पिढीचे मानवी हक्क (ICESER)

क. तिसऱ्या पिढीचे मानवी हक्क (Group Rights)

ड. चौथ्या पिढीचे हक्क (वंचितांचे हक्क) (Rights of underpreviledged)

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ. (2) फक्त ब (3) फकत ड (4) फक्त ड

---

४४. खालीलपैकी कोणते विधान बरोबर नाही ?

(1) जेव्हा आणीबाणी लागू केली जाते, त्यावेळी मूलभूत हक्कावर बंधन येते. ह

(2) भारतात राष्ट्रपतींनी आणीबाणी जाहीर केल्यावर मूलभूत हक्कांच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात आपल्याला दाद मागता येत नाही.

(3) वरील तरतूद घटनेच्या ३५८ व्या कलमात केलेली आहे.

(4) यापैकी नाही.

---

४५. मार्गदर्शक तत्त्वांच्या संदर्भातील घटनादुरुस्त्या बाबतीत खालील विधाने विचारात घ्या व अचूक पर्याय निवडा–

अ. मुंबई विरुद्ध बलसारा खटल्यात न्यायालयाने मार्गदर्शक तत्त्वाचे महत्त्व मान्य केले नाही.

ब. २४ व्या व २५ व्या दुरुस्तीने मार्गदर्शक तत्त्वाच्या अंमलबजावणीसाठी मूलभूत अधिकारात फेरफार करण्याचा अधिकार संसदेला प्राप्त झाला.

क. २५ वी घटनादुरुस्तीन्वये मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करणाराकायदा, १९(ब) व (क) यामधील मूलभूत अधिकारांच्या विरोधात जातो म्हणून तो रद्द करता येऊ शकतो, अशी दुरुस्ती झाली.

ड. ४२ व्या घटनादुरुस्तीनुसार मूलभूत अधिकारांच्या विरोधातील तत्त्वांच्या अंमलबजावणीसाठी केलेला कायदा घटनेतील १४, १९ व ३१ या कलमांचा भंग करतो म्हणून रद्द करता येत नाही असे स्पष्ट झाले.

इ. ८६ व्या घटनादुरुस्तीने ४५ व्या कलमातील शिक्षणाचा समावेश २१ (अ) व ५१ ए (के) कलमात झाला.

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ, ब आणि क (2) ब, क आणि ड

(3) ब, ड आणि इ (4) अ आणि ड फक्त

---

४६. दारिद्र्याचे दुष्टचक्र ही संकल्पना कोणी विकसित केली?

(1) गुन्नर मिर्दाल (2) अभिजित चौधरी (3) रॅग्नर नर्कसे (4) अरविंद पनगारिया

---

४७. तज्ज्ञ ती व त्यांनी सूचविलेल्या संकल्पना यांच्या योग्य जोड्या लावा :

| *स्तंभ –१ व्यक्ती* | *स्तंभ –२ कार्य* |
|---|---|
| अ. इला भट | I. कामासाठी अन्न कार्यक्रम |
| ब. हंसा मेहता समिती (१९५९) | II. रोजगार हमी योजना |
| क. वि. स. पागे | III. श्रमशक्ती अहवाल, १९८८ |
| क. जीन ड्रेझ | IV. स्त्री शिक्षणासाठी राष्ट्रीय मंडळाची स्थापना |

**पर्यायी उत्तरे** :

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| (1) | I | III | II | IV |
| (2) | II | I | III | IV |
| (3) | III | IV | II | I |
| (4) | IV | III | I | II |

---

४८. भारतीय जनगणना प्रक्रियेबाबत योग्य विधाने शोधा.

अ. पहिली अधिकृत जनगणना १८८१ मध्ये घेण्यात आली.

ब. पहिली अनधिकृत जनगणना लॉर्ड मेयोच्या काळात करण्यात आली.

क. नियोजित २०२१ ची जनगणना ही १६ वी अधिकृत जनगणना आहे.

**पर्यायी उत्तरे** :

(1) फक्त अ आणि क (2) फक्त अ आणि ब

(3) फक्त ब (4) वरील सर्व

---

४९. १२ व्या पंचवार्षिक योजनेत पुढीलपैकी कोणता निकष विचारात घेतला होता?

(1) चिरंतन आणि जास्त सर्वसमावेशक विकास

(2) गतिशील आणि जास्त सर्वसमावेशक विकास

(3) गतिशील, चिरंतन आणि जास्त सर्वसमावेशक विकास

(4) चिरंतन आणि जास्त सर्वसमावेशक विकास

---

Study CIRCLE

५०. जोड्या जुळवा :

| *स्तंभ –१ तज्ज्ञ* | *स्तंभ – २ दारिद्र्यरेषेचा निकष* |
|---|---|
| अ. प्रा. बी. एस. मिन्हास | I. ग्रामीण – १८० रु. शहरी – २७० रु. इतकादरडोई दरवर्षी उपभोग१ खर्च नसणाऱ्या व्यक्ती |
| ब. प्रा. पी. डी. ओझा | II. दरवर्षी दरडोई २४० रु. उपभोग खर्च |
| क. डॉ. पी. के. वर्धन | III. नागरी व्यक्तीसाठी ४३२ ग्रॅम्स, ग्रामीण व्यक्तीसाठी५१८ ग्रॅम्स अन्नउपभोग |
| ड. प्रा. वि. म. दांडेकर | IV. दरमहा दरडोई १५ रु.खर्च न करणाऱ्या व्यक्ती |

**पर्यायी उत्तरे :**

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| (1) | II | III | I | IV |
| (2) | II | I | III | IV |
| (3) | II | III | IV | I |
| (4) | IV | III | I | II |

५१. राष्ट्रीय मानव विकास अहवालात वंचितांसाठी मानवी दारिद्र्य निर्देशांक मोजमापात खालीलपैकी कोणत्या बाबींवर एक तृतीयांश भर दिला जातो?

अ. मूलभूत गरजा  ब. शैक्षणिक  क. आरोग्यविषयक  ड. आर्थिकविषयक

**पर्यायी उत्तरे :**

(1) ब, क आणि ड  (2) ब आणि क  (3) अ आणि ब  (4) क आणि ड

५२. खालीलपैकी कोणते सहस्रक विकास ध्येय ***नव्हते***?

(1) महिलावरील अत्याचाराचे उच्चाटन

(2) मातेचे आरोग्य उंचावणे

(3) एचआयव्ही, एडस, मलेरिया आणि इतर आजारांशी सामना करणे

(4) बालमृत्यू कमी करणे

५३. ९ मे २०१५ रोजी पंतप्रधानानी देशाच्या विविध भागामध्ये विविध योजनांचा शुभारंभ केला होता, त्या योजना शोधा–

अ. पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजना.

ब. पंतप्रधान किसान सन्मान योजना.

क. पंतप्रधान सुरक्षा विमा योजना

ड. अटल पेन्शन योजन

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ आणि ब  (2) फक्त ब आणि क  (3) फक्त ब  (4) अ, क आणि ड

study CIRCLE

५४. जीवनमानाचा भौतिक गुणवत्ता निर्देशांक (Physical Quality of Life Index) - PQLI हा निर्देशांक –

अ. तयार करण्यासाठी २५ भारीत निर्देशांकाचा वापर केला जातो.

ब. सर्वप्रथम १९७९ मध्ये अमेरिकेतील 'ओव्हरसीज डेव्हलपमेंट कौन्सिल' या संघटनेने हा निर्देशांक तयार केला.

क. मॉरीस–डी–मॉरीस यांनी यासाठी नागरिकांचे सरासरी आयुर्मान, बालमृत्यूचे प्रमाण, आणि साक्षरता – हे घटक विचारात घेतले.

ड. १९९० मध्ये सुधारित करुन मानव विकास निर्देशांक तयार करण्यात आला.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ आणि ब (२) फक्त ब आणि क

(3) वरीलपैकी कोणतेही नाही (4) वरील सर्व

---

५५. २०१४ पासून सुरु झालेल्या विकास कार्यक्रमांचा योग्य क्रम लावा–

अ. सौभाग्य योजना

ब. प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना

क. पंतप्रधान जनधन योजना

ड. श्रमेव जयते

**पर्यायी उत्तरे :**

(1) क, ड, अ, ब (2) ब, ड, क, अ (3) क, ड, ब, अ (4) क, ब, ड, ब

---

५६. जोड्या जुळवा :

| ***स्तंभ –१ आर्थिक स्थिती*** | ***स्तंभ – २ संकल्पना*** |
|---|---|
| अ. सर्वसाधारण किमतीतील सतत वाढ | I. बेसुमार चलनवाढ |
| ब. मंदी बहिर्गमन भाववाढ | II. मुद्रा अवस्फिती |
| क. रोजगार व किमतीत घट, उत्पादन व उत्पन्न वाढ | III. मुद्रा अवपतन |
| ड. मंदीशी संबंधित भाववाढ | IV. भाववाढ/ किंमतवाढ |
| | V. फुगवटा |

**पर्यायी उत्तरे :**

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| (1) | V | III | I | IV |
| (2) | V | IV | II | III |
| (3) | III | II | IV | I |
| (4) | IV | III | V | II |

---

५७. खालीलपैकी चुकीचे सूत्र ओळखा.

(1) जी. एन. पी. – एन. एन. पी. = घसारा

(2) एन. एन. पी. (घटक खर्चानुसार) = एन. एन. पी. (बाजार किंमत) + अनुदान अप्रत्यक्ष कर

(3) जी. एन. पी. = एन. एन. पी. – घसारा

(4) जी. एन. पी = जी. डी. पी. + विदेशी निव्वळ उत्पन्न

---

५८. रिझर्व्ह बँकेच्या संख्यात्मक पतधोरणाद्वारे व्यवस्थेतील पैशाचा पुरवठा कमी किंवा जास्त होतो. यातील प्रमुख बाबी कोणत्या?

अ. रेपो दर (रेपो रेट) व रिव्हर्स रेपो दर

ब. वैधानिक तरलता प्रमाण (स्टॅट्युटरी लिक्विडिटी रेशो – एसएलआर)

क. रोख राखीव प्रमाण (कॅश रिझर्व्ह रेशो – सीआरआर)

ड. मार्जिनल लेंडिंग फॅसिलिटी रेट

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त क आणि ड (2) अ, ब आणि क (3) वरील सर्व (4) फक्त ब, क आणि ड

---

५९. २६ मार्च २०२० रोजी केंद्राने जाहीर केलेल्या आर्थिक पॅकेजबाबत योग्य जोड्या जुळवा.

| ***कॉलम I लाभार्थी गट*** | ***कॉलम II आर्थिक पॅकेज रु.*** |
|---|---|
| अ. महिला स्वयंसेवी गट | I. उज्ज्वला योजनेंतर्गत मोफत एलपीजी सिलेंडर |
| ब. डॉक्टर, आशा, आरोग्य कर्मचारी | II. तीन महिने दोन हप्त्यांत १ हजार रु. |
| क. दारिद्र्य रेषेखालील कुटुंब | III. २० लाख रु.पर्यंतचे कर्ज |
| ड. ६० वर्षांवरील वृद्ध, विधवा, दिव्यांग | IV. ५० लाख रु.चा विमा |

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | II | III | I | IV |
| (2) | III | IV | I | II |
| (3) | III | II | IV | I |
| (4) | IV | III | I | II |

---

६०. कृषी कर्जमाफी प्रक्रियेत पुढीलपैकी कोणती समस्या निर्माण होऊ शकते?

अ. सरकारच्या अर्थसंकल्पात तूट वाढते.

ब. नव्या हंगामासाठी शेतकऱ्यांना कर्ज मिळणे घटते.

क. सर्वसामान्य उपभोक्त्याला अन्न–भाववाढीस सामोरे जावे लागते.

ड. बँकांना निर्लेखन करणे बंधनकारक झाल्यास बँकांची भांडवली, कर्ज देण्याची क्षमता कमी होते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ आणि ब (2) फक्त क आणि ड

(3) वरीलपैकी कोणतीही नाही (4) वरील सर्व

---

६१. खालीलपैकी कोणत्या कराराखाली जागतिकदृष्ट्या महत्त्वाच्या पाणथळ्याचे संरक्षण व संवर्धन केले जाते?

अ. क्योटो करार ब. बेसल करार क. रामसर करार ड. मॉंट्रिअल करार

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ आणि ब बरोबर (2) फक्त क आणि ड बरोबर

(3) फक्त क बरोबर (4) फक्त अ, क आणि ड बरोबर

---



study CIRCLE

६२. जोड्या जुळवा.

| *स्तंभ अ (पर्यावरण क्षेत्रातील पुरस्कार)* | *स्तंभ ब (सुरुवातीचे वर्ष)* |
|---|---|
| अ. इंदिरा गांधी पर्यावरण पुरस्कार | I. 1986 |
| ब. इंदिरा प्रियदर्शनी वृक्षमित्र अवॉर्ड | II. 1978 |
| क. पीतांबर पंत नॅशनल एनव्हायर्नमेंट फेलोशिप | III. 1993 |
| ड. बी. पी. पाल नॅशनल एनव्हायर्नमेंट फेलोशिप फॉर बायोडायव्हर्सिटी | IV. 1987 |

**पर्यायी उत्तरे :**

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| (1) | II | III | I | IV |
| (2) | II | I | II | IV |
| (3) | IV | I | II | III |
| (4) | IV | III | I | II |

---

६३. समुद्रातील तेलगळतीमुळे ......

अ. सुंद्री वनस्पतींच्या प्रकाशसंश्लेषणाचा वेग मंदावतो.

ब. तेल खारफुटीच्या मुळाशी जाते व त्या वनस्पती मरतात.

क. सागरी जलातील विद्राव्य ऑक्सिजनचे प्रमाण कमी होते.

ड. मॅंग्रूव्ह वनाला आग लागण्याची शक्यता वाढते.

वरीलपैकी कोणते परिणाम बरोबर आहेत?

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ, ब आणि क बरोबर
(2) फक्त अ आणि क बरोबर
(3) फक्त ब, क आणि ड बरोबर
(4) अ, ब, क आणि ड बरोबर

---

६४. अपायकारक रसायने अन्नसाखळीत एकत्रित होण्याचे प्रमाण वाढते, ही प्रक्रिया कोणत्या संज्ञेने संबोधली जाते?

(1) बायोॲक्युम्युलेशन
(2) बायोमॅग्निफिकेशन
(3) बायोएक्सक्रीशन
(4) बायोएकस्पान्शन

---

६५. क्लोरोफ्लुरोकार्बन्स हे ओझोनचा थर नष्ट करण्यास जबाबदार मानले जातात. त्याचे खालीलपैकी कोणते गुणधर्म बरोबर आहेत?

अ. ते रंगहीन असतात.

ब. ते ज्वलनशील नसतात.

क. ते द्रवरूप, वायुरूप व स्थायुरूपात उपलब्ध होऊ शकतात.

ड. अतिनील किरणांच्या मदतीने ते ऑक्सिजन रेणूचे विघटन करू शकतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त क आणि ड
(2) अ, ब, क आणि ड
(3) फक्त अ आणि ब
(4) फक्त ब, क आणि ड

---

६६. स्तंभ पेशीसंदर्भात (स्टेम सेल) खालीलपैकी कोणते विधान **अचूक** नाही?

(1) भ्रूणस्तंभ कोशिका बहुक्षमताधारी असतात.

(2) त्या स्वतःचे विभाजन आणि नूतनीकरण जास्त कालावधीपर्यंत करू शकतात.

(3) त्या केवळ भ्रूणावस्थेत आढळतात.

(4) कायस्तंभ कोशिका मुकूलकोषिकांपासून मिळविल्या जातात.

---

६७. रासायनिक खतांचे अनेक दुष्परिणाम आहेत. त्यामुळे आज शेतकऱ्यांना जैव–खते वापरण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. खालीलपैकी कोणता सजीव हा भातशेतीमध्ये जैव–खत म्हणून वापरला जातो?

(1) मायकोऱ्हायझा (2) रायझोबियम (3) ॲझेटोबॅक्टर (4) ॲनाबिना, ॲझोला

---

६८. खालील जोड्या जुळवा :

| **स्तंभ अ (शेवाळचा प्रकार)** | **स्तंभ ब (उदाहरण)** |
|---|---|
| a) नीलहरित शैवाल | i) आस्सीलॅटोरिया |
| b) हिरवे शैवाल | ii) एंटेरोमार्फा |
| c) पिवळसर शैवाल | iii) सरगासम |
| d) लाल शैवाल | iv) ग्रॅसीलॅरिया |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (2) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (3) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (4) | (i) | (ii) | (iii) | (iv) |

---

६९. हिरा सर्वांत कठीण असतो कारण ......

अ. कार्बनचे द्विमितीय जाळे आणि रज्जुबंधन क्षमता

ब. कार्बनचे त्रिमितीय जाळे

**पर्यायी उत्तरे** :

(1) फक्त अ (2) फक्त ब (3) अ आणि ब दोन्ही (4) कोणतेही नाही

---

७०. अतिशय शक्तिशाली रेडिओ लहरीबाबत योग्य विधाने शोधा.

अ. या लहरीमुळे उष्णता निर्माण होते, मात्र ५ जी रेडिओ लहरी मानवी शरीराच्या तापमानात बदल करण्याइतक्या शक्तीशाली नाहीत.

ब. बॅक्टेरिया रेडिओ लहरी तयार करू शकतात, पण कोरोना व्हायरस अशा लहरी निर्माण करु शकत नाही.

क. ५ जी रेडिओ लहरींव्दारे कोरोना व्हायरस ट्रान्समिट होतो.

ड. व्हायरसचा मोबाईल फोनमध्ये वापरल्या जाणाऱ्या इलेक्ट्रोमॅग्नटिक लहरीशी संबंध आहे.

**पर्यायी उत्तरे** :

(1) अ, ब आणि क (2) अ आणि ब (3) अ आणि क (4) ब आणि ड

---



study CIRCLE

७१. जोड्या जुळवा :

| **स्तंभ अ (*अणुभट्टी*)** | **स्तंभ ब (*इंधन*)** |
|---|---|
| अ. पी. एच. डब्ल्यू. आर | I. एम. ओ. एक्स |
| ब. पी. एफ. बी. आर | II. समृद्ध युरेनिअम |
| क. ए. एच. डब्ल्यू. आर | III. नैसर्गिक युरेनिअम |
| ड. व्ही. व्ही. ई. आर | IV. थोरियम–युरेनिअम इंधन चक्र |

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | II | III | I | IV |
| (2) | II | I | III | IV |
| (3) | II | I | IV | III |
| (4) | IV | III | I | II |

---

७२. वैज्ञानिक संशोधन व शोधाच्या दृष्टीने विचार केला तर १६६५–६६ हा एक वर्षाचा कालावधी न्यूटनसंबंधी 'आश्चर्यवर्ष' म्हणून ओळखला जातो. या कालावधीत न्यूटनने कोणता शोध लावला ?

(1) गुरुत्वाकर्षण (2) कॅल्क्युलस ही गणितीय प्रणाली

(3) प्रकाश पृथ्थकरणासंबंधीचा सिद्धांत (4) वरीलपैकी सर्व

---

७३. आधुनिक आवर्तसारणी म्हणजे ........ आणि ...... च्या संयोगीकरणाचे फलित होय.

अ. मेंडेलिफची उपपत्ती

ब. अणूमधील इलेक्ट्रॉनचे संरूपण

क. पुंजयामी उपपत्ती

ड. बाहेरची अणू उपपत्ती

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ, ब आणि क (2) अ आणि ब (3) अ आणि क (4) ब आणि ड

---

७४. रेबीजबद्दल खालीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत?

अ. तो चेतासंस्थेवर परिणाम करतो.

ब. तो विषाणूमुळे होतो.

क तो जिवाणूमुळे होतो.

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ आणि ब (2) ब आणि क (3) अ आणि क (4) अ, ब आणि क

---



Study CIRCLE

७५. खालीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत?

अ. तारामासा हा पाच बाहू असणारा सागरी मासा आहे.

ब. व्हेल हा मत्स्यवर्गातील सर्वात मोठा मासा आहे.

क. अस्कॅरिस हा गोलकृमी शरीरपोकळी (सिलोम) असणारा प्राणी आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ आणि ब (2) ब आणि क (3) अ आणि क (4) अ, ब आणि क

---

७६. बीसीजी (बेसिलस कॅलमेट–ग्यूरिन) अर्थात क्षयरोग प्रतिबंधक लशीबाबत अचूक विधाने शोधा–

अ. या लसीचा सर्वप्रथम वापर १९६१ मध्ये करण्यात आला होता.

ब. बीसीजी लसीमुळे माणसांच्या शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती वाढू शकते.

क. भारतात १९६२ पासून राष्ट्रीय क्षयरोग प्रतिबंधक कार्यक्रमानुसार मुल जन्माला आल्यानंतर बीसीजी लस टोचली जाते

ड. ही लस, हार्वर्ड मेडिकल स्कूलचे डॉ. डिनाइज फॉस्टमॅन यांच्या मते टाइप–१ डायबेटिसवर परिणामकारक आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ, ब आणि क (2) फक्त अ आणि ब (3) अ आणि क (4) फक्त ब, क आणि ड

---

७७. लोखंड व गंधक एकत्र तापविल्यास तयार होणारे आयर्न सल्फाईड ....

अ. लोखंडाप्रमाणे लोहचुंबकाकडे आकर्षिले जाते.

ब. लोखंडाप्रमाणे लोहचुंबकाकडे आकर्षिले जात नाही

क. गंधकाप्रमाणे कार्बन डाय सल्फाइड या द्रावकात ते विरघळते.

ड. गंधकाप्रमाणे कार्बन डाय सल्फाइड या द्रावकात ते विरघळतही नाही.

वरीलपैकी कोणती विधाने सत्य आहेत?

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ आणि क (2) अ आणि ड (3) ब आणि क (4) ब आणि ड

---

७८. जर १० से.मी. नाभीय अंतर असलेली दोन भिंगे एकमेकांपासून १० से.मी. अंतरावर ठेवली, तर त्यांच्या संयोगी भिंगाचा भिंगांक किती ?

(1) १०० D (2) २० D (3) १० D (4) ५ D

---

७९. खाली नमूद केलेली वैशिष्ट्ये ही ........ याने सूचविलेल्या आवर्तसारणीची आहेत.

अ. आवर्तसारणीत एकूण आठ गण व सात आवर्तने.

ब. मूलद्रव्यांचे गुणधर्म त्यांच्या अणुभारांकांचे आवृत्तीफल आहेत.

क. ज्या मूलद्रव्यांचा शोध लागला नव्हता अशा मूलद्रव्यांसाठी या आवर्तसारणीत रिकाम्या जागा सोडल्या होत्या.

ड. काही मूलद्रव्यांचे अणुभार चुकीचे होते, ते या आवर्तसारणीवरून दुरुस्त करण्यात आले.

**पर्यायी उत्तरे :**

(1) डोबेरायनची आवर्तसारणी (2) मेंडेलिफची आवर्तसारणी

(3) मोस्ले ची आवर्तसारणी (4) न्यूलॅंडस ची आवर्तसारणी

---



Study CIRCLE

८०. हायड्रॉक्सिक्लोरोक्विन सल्फेट (एचसीक्यूएस) बाबत खालीलपैकी कोणते विधान ***योग्य*** आहे?

अ. एचसीक्यूएस औषधामुळे हिमोग्लोबिन कमी होते.

ब. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने त्याला औषध आणि प्रसाधन नियमावली १९४५ नुसार शेड्यूल एच१ चा दर्जा दिला आहे.

क. इप्का फार्मास्युटिकल्स आणि झायडस या दोन कंपन्या हे औषध बनवतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) सर्व विधाने सत्य आहेत.

(2) अ आणि ब विधाने चूक आहेत परंतु क विधान बरोबर आहे.

(3) अ विधान हे क आणि ब ची फलनिष्पत्ती आहे.

(4) क विधान हे अ आणि ब ची फलनिष्पत्ती आहे.

---

८१. एका व्यक्तीच्या चष्म्याचा नंबर – २.५० ..... आहे. त्याच्या काचा...

(1) २.५० मी. नाभीय अंतराच्या अंतर्वक्र भिंग असतील.

(2) ४० सेंमी. नाभीय अंतराच्या अंतर्वक्र भिंग असतील.

(3) ४० सेंमी. नाभीय अंतराच्या बहिर्वक्र भिंग असतील.

(4) ०.५० मी. नाभीय अंतराच्या बहिर्वक्र भिंग असतील.

---

८२. खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे ?

(1) १ मिलिग्रॅम वस्तुमानाचे ऊर्जेत रूपांतर केल्यास मिळणारी ऊर्जा = ९ x १०$^{१०}$ ज्यूल

(2) 'm' वस्तुमान असलेली वस्तू v या चालीने गतिमान असेल, तर त्याची गतिज ऊर्जा = १/२ $mv^2$

(3) उंच इमारतीच्या गच्चीवरून खाली सोडलेल्या चेंडूचा ५ सेकंदानंतरचा वेग = ९८ मी./से.

(4) बुध हा सूर्याच्या सगळ्यात जवळ आणि आपल्या सूर्यमालेतील सगळ्यात लहान ग्रह आहे.

---

८३. खालीलपैकी कोणता आजार आदिजीवामुळे होत नाही?

(1) काला आजार (2) अमेरिकन छगॅस डिसिज (3) मलेरिया (4) यापैकी नाही

---

८४. कोणत्या वनस्पतीमध्ये सी. ए. एम. अथवा $C_3$ या प्रकारचे प्रकाशसंश्लेषण होते?

(1) मका (2) ज्वारी (3) ऊस (4) वरील सर्व

---

८५. 'रिलायन्स लाईफ सायन्सेस'मधील संशोधकांच्या मते वनस्पतीपासून मिळणाऱ्या या घटकामध्ये विषाणुजन्य आजारांचा सामना करण्याची मोठी क्षमता असते.

अ. कारागीनन व रमनन सल्फेट ब. अल्गीनेटस व फूकोडिन क. कॅरोटीन व कुकुरमिन

वरीलपैकी कोणते विधान/ने बरोबर आहे/त?

(1) अ आणि ब (2) ब आणि क (3) अ आणि क (4) अ, ब आणि क

---

८६. खालीलपैकी कोणते विधान ***चुकीचे*** आहे ?

(1) मुंबई–पुणे घाटरस्त्याची स्मृतिकमान म्हणजे 'अमृतांजन पूल'.

(2) मुंबई–पुणे रेल्वेसेवा १८७२ मध्ये सुरू झाली.

(3) मुंबई–पुणे बोरघाटाचा रस्ता १० नोव्हेंबर, १८३० रोजी खुला करण्यात आला.

(4) सर मेजर जनरल जॉन माल्कम यांच्या कारकिर्दीत कॅप्टन ह्यूजेस यांनी या घाटरस्त्याचे काम पुरे केले.

---

८७. चायना थ्री गॉर्जेस कॉर्पोरेशन (सीटीजीसी) या चिनी सरकारी कंपनीमार्फत पाकिस्तानव्याप्त काश्मीरमध्ये बांधल्या जात असलेल्या धरणाबाबत खालील विधाने विचारात घ्या :

अ. झेलम नदीवर हे धरण बांधले जात असून यातून ११०० मेगावॉट वीजेची निर्मिती केली जाणार आहे.

ब. कोहला धरण हे न्यू चायना पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉरमधील महत्वाचा प्रकल्प आहे

क. या प्रकल्पासाठी सुमारे २.४ अब्ज रुपये खर्च येणार आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) विधाने अ, ब बरोबर
(2) विधाने ब, क बरोबर
(3) विधाने अ, क बरोबर
(4) सर्व विधाने बरोबर

---

८८. बँक विलीनीकरणाबाबत खालीलपैकी कोणती जोडी ***चुकीची*** आहे?

(1) २०१६ – स्टेट बँक ऑफ इंडियात भारतीय महिला बँक विलीन

(2) २०१९ – बँक ऑफ बडोदामध्ये विजया व देना बँक विलीन

(3) २०२० – युनियन बँकेत आंध्र बँक आणि कॉर्पोरेशन बँकेचे विलीन.

(4) २०१७ – बँक ऑफ इंडियात इंडियन ओव्हरसीज बँक विलीन

---

८९. किरगीझस्तानविषयी योग्य विधान पुढील विधानांतून निवडा.

अ. सोव्हिएत रशियाच्या १९९१ च्या अध/पतनानंतर किरगीझस्तान स्वतंत्र झाला.

ब. बिश्केक त्याची राजधानी आहे.

क. त्याच्या सीमा चीनशी जोडलेल्या आहेत.

ड. किरगीझस्तानची मुद्रा चलन सोम ही आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ, ब, क आणि ड
(2) ब आणि क
(3) अ आणि ब
(4) क आणि ड

---

९०. मुस्लिम महिलांच्या संदर्भातील 'तलाक–ए–बिद्दत २०१८' कायद्यानुसार तलाक हा दंडनीय गुन्हा असून त्यात काय अंतर्भूत आहे?

अ. 'तलाक–ए–बिद्दत' दण्डनीय (गुन्हा) अपराध असून असे करणाऱ्या व्यक्तीस तीन वर्ष कारावास होईल.

ब. पीडित महिला किंवा नातेवाईकांनी तक्रार अर्ज केल्यास नवऱ्याला अटक करण्याचा अधिकार पोलिसाना राहील.

क. पीडित महिलेची बाजू ऐकल्याशिवाय, मॅजिस्ट्रेट गुन्हेगार पतीला जमानत देऊ शकणार नाही.

ड. हा अध्यादेश सहा महिन्यापर्यंत प्रभावी राहील.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ आणि ब (2) फक्त अ, ब आणि क

(3) फक्त अ,क आणि ड (4) वरील सर्व

---

९१. विजया श्रीनिवास जहागीरदार यांनी लिहिलेल्या कथासंग्रह व कादंबऱ्या ओळखा –

अ) ययातिकन्या माधवी ब) शापित गुलमोहर

क) कालचक्र ड) कर्मयोगिनी इ) केसरपक्षी

**पर्यायी उत्तरे** :

(1) फक्त अ (2) फक्त अ आणि ब

(3) फक्त ब आणि क (4) वरील सर्व

---

९२. जोड्या जुळवा : (विस्डेन क्रिकेटर सन्मान २०१९)

| *स्तंभ I* | *स्तंभ II* |
|---|---|
| अ) विस्डेन लीडिंग क्रिकेटर ऑफ द इयर | i. जोफ्रा आर्चर (इंग्लंड) |
| ब) विस्डेन लीडिंग फिमेलक्रिकेटर ऑफ द इयर | ii. आंद्रे रस्सेल (वेस्ट इंडिज) |
| क) विस्डेन लिडिंग टी–२० क्रिकेटर ऑफ द वर्ल्ड | iii. एलिस पेरी (ऑस्ट्रेलिया) |
| ड) विस्डेनचे २०१९ मधील सर्वश्रेष्ठ खेळाडू | iv. बेन स्टोक्स (इंग्लंड) |
| | v. पॅट कमिन्स (ऑस्ट्रेलिया) |
| | vi. सिमोन हार्मर(ऑस्ट्रेलिया) |

**पर्यायी उत्तरे** :

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| (1) | ii | v | iv | i, iii, vi |
| (2) | iv | iii | ii | i, v, vi |
| (3) | iv | ii, iii | v | i, vi |
| (4) | vi | ii | iii, iv | i, v |

---

९३. चीनमध्ये करोनाचा पहिला रुग्ण .......... रोजी सापडला.

(1) २२ नोव्हेंबर २०१९ (3) २ जानेवारी २०२०

(3) ३० डिसेंबर २०१९ (4) २६ डिसेंबर २०१९

---

९४. फील्ड्स मेडल व आबेल पुरस्कार दोन्ही सन्मान मिळविणारे गणितज्ञ कोण ?

(1) येल विद्यापीठातील प्रा. ग्रेगरी मार्ग्विलिस

(2) हिब्रू विद्यापीठातील प्रा. हिलेल फर्स्टेनबर्ग

(2) प्रिन्स्टनविद्यापीठातील प्रा. ज़ोन नॅश

(4) वरीलपैकी सर्व

---

९५. १२६ वे घटनादुरुस्ती विधेयक २०१९ बाबत खालीलपैकी कोणते विधान ***चुकीचे*** आहे?

अ. हे विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहात साध्या बहुमताने म्हणजेच हजर राहून मतदान करणाऱ्या सदस्यांच्या बहुमताने मंजूर झाले.

ब. या विधेयकाने लोकसभा आणि विधानसभांमधील अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी असलेला राखीव जागांचा हिस्सा आणखी पुढील १० वर्षांसाठी वाढविण्यात आला आहे.

क. या विधेयकाने अँग्लो-इंडियन जमातीसाठी असलेला राखीव जागांचा हिस्सा वाढविण्याची शिफारस केलेली नाही ज्याची मुदत २५ जानेवारी २०२० रोजी संपुष्टात आली.

वरीलपैकी कोणते विधान/ने सत्य आहेत ?

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ (2) अ आणि ब (3) फक्त क (4) वरील सर्व

---

९६. अमेरिकेत न्यायाधीशपदी नेमणूक झालेल्या ३ भारतीय वंशाच्या महिला न्यायाधीशामध्ये खालीलपैकी कोणते नाव ***चुकीचे*** आहे ?

(1) दीपा आंबेकर (2) राजा राजेश्वरी (3) अर्चना राव (4) यापैकी नाही

---

९७. खालील विधाने विचारात घ्या :

अ. आपत्ती व्यवस्थापन अधिनियमानुसार सर्व राज्य शासनांनी 'राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण' स्थापन करणे अनिवार्य आहे.

ब. 'राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे' अध्यक्ष म्हणून राज्याचे गृहमंत्री कार्य करतात.

क. 'जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे' अध्यक्ष म्हणून जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अथवा जिल्हा दंडाधिकारी हे असतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ आणि ब (2) अ आणि क (3) अ,ब आणि क (4) फक्त अ

---

९८. समुद्रतळाखालून केबल टाकून अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने बेटावर वीज पोहचविण्याची घटना देशात प्रथमच घडली या घटनेद्वारे कोणत्या बेटावर वीज पोहचविण्यात आली?

(1) राजापुरी (2) भाट्ये (3) घारापुरी (4) मार्वे

---



Study CIRCLE

९९. निती आयोगाचे सदस्य प्रा. रमेश चंद यांनी शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा कृतिकार्यक्रम सरकारला सादर केलेला होता. त्यांच्या मते.....

a) कृषी विकास दर १०.४ टक्के असेल तर शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होऊ शकते.

b) कृषी विकास दर १४.४ टक्के असेल तर शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होऊ शकते.

c) कृषी क्षेत्रात अतिरिक्त ६.४० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आवश्यक

**पर्यायी उत्तरे –**

(1) विधाने (a) आणि (b) बरोबर, (c) चुकीचे.

(2) विधाने (b) आणि (c) चुकीचे, (a) बरोबर

(3) विधाने (a) आणि (c) बरोबर, (b) चुकीचे

(4) सर्व विधाने बरोबर आहेत.

---

१००. एप्रिल २०२० मध्ये ''कोविड १९: शॉकडाऊन टू द डेवलपिंग कंट्रीज ''हा अहवाल क़ोणी प्रसिद्ध केला ?

(1) अंक्टांड

(2) जागतिक व्यापार संघटना

(3)) जागतिक आरोग्य संघटना

(4) यूएनसीटीएडी संयुक्त राष्ट्र व्यापार आणि विकास संघटना

---